**रे.दि.मु.नं.३७/२०१८**
**नि.क्र.६० लगत**

**<u>वादीचा उर्वरीत उलटतपास प्रतिवादींतर्फे वकील श्री. व्ही. व्ही. पावसकर यांचेकडुन शपथेवर सुरू</u> -**

**१३.** **प्रश्न -** तुमचा पगार कामुसार बदलतो याबाबत तुमचे काय स्पष्टीकरण आहे?

**उत्तर -** साक्षीदाराने मी या प्रश्नाचे उत्तर देणार नाही असे सांगितले.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, ३० वर्षापासून मी शिपवर काम करतो. हे मला माहिती नाही की, आज रोजीचा चिफ ऑफिसर पदाचे वेतन किती आहे. मी माझ्या खात्यात शेवटचा पगार किती तारखेला जमा झाला सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला आज रोजी रक्कम रूपये दहा लाख महिना पगार आहे. मी आयकर भरतो की नाही याचे उत्तर देणार नाही. फोन नंबर क्रमांक ८१४९९५६८४ हा नंबर माझा नाही. फोन नंबर क्रमांक ९४२०९२७७४ हा नंबर माझा आहे.

**१५.** हे मला माहिती नाही की, दि. २४/१०/२०१८रोजी मी दावा दाखल केला. साक्षीदार सांगतो की, २०१८ साली मी दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, बोरीवली न्यायालयात डि. व्ही. केस. नंबर. २०१/२०१६ या माझ्या पत्नीने दाखल केलेल्या तक्रारीमध्ये मी व माझी आई-वडील, भाऊ हजर झालेलो आहोत. हे म्हणणे खरे आहे की, त्या डी.व्ही. केस नंबर २०१/२०१६ मध्ये माझे व माझ्या कुटुंबियाविरूध्द माझ्या पत्नीने तिचा शारीरिक, मानसिक छळ केल्याबाबत आरोप केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दाव्यामध्ये डी. व्ही. केस नंबर २०१/२०१६ चा उल्लेख आहे. हे मला आठवत नाही की, डि. व्ही. केस नंबर २०१/२०१६ मध्ये माझ्याविरूध्द दरमहा रक्कम रूपये ३०,०००/- अंतरिम पोटगी देण्याबाबत आदेश पारीत केलेला आहे.

**१६.** **प्रश्न** - त्या प्रकरणामध्ये तुमच्या विरूध्द रत्नागिरी ग्रामीण पोलीसामार्फत माझ्या विरूध्द रिकव्हरी वॉरंट बजावणी झाली असता तुम्ही रक्कम रूपये ५,४७,०००/- चा चे देवून वॉरंट कॅन्सल केले ?

**उत्तर** - यांचे उत्तर मला दयायचे नाही.

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, दि. २९/०५/२०१८ रोजी मी रक्कम रूपये ५,४७,०००/- चा चेक माझी पत्नी श्रध्दा अतुल लाडसावंगीकर हिच्या नावे काढला होता.

**१८.** **प्रश्न** दि.२९/०५/२०१८ नंतर तुम्ही पत्नी प्रतिवादीला एकही रूपया दिलेला नाही ?

**उत्तर -** मला याचे उत्तर दयायचे नाही.

**१९.** मी बोरीवली न्यायालयात तारखेला गरज असेल त्यावेळी हजर असतो.

**२०.** **प्रश्न** तुम्हाला बोरीवली न्यायालयातील प्रकरणाची पुढील तारीख माहिती आहे काय ?

**उत्तर** मला याचे उत्तर दयायचे नाही.

**२१.** याची मला माहिती नाही की, डी व्ही केस ची पुढील तारीख १४ ऑगस्ट आहे. मी पदवीधर आहे.

**२२.** **प्रश्न** - डी व्ही केसच्या मागील तारखेस आपण हजर नव्हता कारण आपल्याला रक्कम रूपये २०,००,०००/- त्या केसमधील अर्जदाराला दयायचे होते?

**उत्तर** - याचे उत्तर मला दयायचे नाही.

**२३.** हे म्हणणे खरे आहे की, माझे आणि प्रतिवादीचे लव्ह मॅरेज आहे. मला प्रतिवादीच्या कुटुंबाची पूर्ण माहिती होती. सुशिला वामन मुळये रत्नागिरीला रहायच्यात. हे म्हणणे खरे नाही की, सुशिला मुळये त्यांच्या मृत्यूपर्यंत रत्नागिरीतच

रहायच्यात. सुशिला मुळ्ये यांना दोन मुली होत्या. त्यांची नावे निता जयंत शेवडे, संगिता श्रीराम कात्रे अशी आहेत.

**२४.** हे म्हणणे खरे नाही की, निता शेवडे यांना माझी पत्नी आणि कल्पना शेवडे अशा दोन मुली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, निता शेवडे यांना एक भाऊ आहे. निता शेवडे यांना तीन मुली आणि एक मुलगा आहे. निता शेवडे यांना माझी पत्नी, कल्पना शेवडे, वर्षा जोशी अशा तीन मुली आहेत. वर्षा जोशी रत्नागिरीत राहतात. संगिता कात्रे यांना एकच मुलगा होता.

**२५.** माझी पत्नी लग्नाआधी कोणतेही काम करीत नसे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीशी प्रेमविवाह करण्यास माझ्या कुटुंबियांचा विरोध होता व आहे.

**२६.** **प्रश्न** - तुमच्या घरी असलेली गाडी क्रमांक एम. एच. ०८ ए. एन. ५७०३ ही गाडी तुमच्याच नावावर आहे ?

**उत्तर** - याचे उत्तर मला दयायचे नाही.

**२७.** **प्रश्न -** आज तुम्ही वडील किंवा भावासोबत न्यायालयात आला आहात ?

**उत्तर** -मी न्यायालयात हजर आहे.

**२८.** **प्रश्न** -आज तुम्ही न्यायालयात भावासोबत की वडीलांसोबत आलात ?

**उत्तर -** मला उत्तर दयायचे नाही.

**२९.** हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी माझा भाऊ न्यायालयात हजर आहे. हे म्हणणे खरे आहे की, वर नमुद केलेले वाहन आज न्यायालयाच्या परिसरात हजर आहे. माझ्या मेव्हुण्याचे नाव पराग शेवडे असे आहे. हे मला माहिती नाही की, त्याचे अदयाप लग्न झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सुशिला मुळ्ये यांच्या वारसांना याकामी पक्षकार केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ५५/०३

ची मुळ मालक सुशिला मुळये आहे.

**३०.** हे म्हणणे खरे आहे की, ट्रान्सफर व्हायच्या आधी मिळकतीची मुळ मालक सुशिला मुळे होत्या. हे म्हणणे खरे आहे की, मी कोतवडे येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, चारचाकी वाहनाने कोतवडे ते कोळंबे हे अंतर अंदाजे दीड तासाचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचा सुशिला मुळे यांच्या वारस हक्काने माझा काही संबंध नव्हता. हे मला माहिती नाही की, वारस हक्काने निता शेवडे, संगिता कात्रे, त्यांची मुले व नातवंडे यांचा या मिळकतीशी संबंध होता. १०/०४/२००८ रोजी मुंबई येथे सुशिला मुळये यांचा वृध्दापकाळाने मृत्यू झाला. मृत्युसमयी त्यांचे वय अंदाजे ९२ वर्षे होते. हे म्हणणे खरे नाही की, मरणाआधी त्या अथंरूणाला खिळून होत्या.

**३१.** मी दावा वाचलेला आहे. मी दावा दाखल करणेपूर्वी सर्व कागदपत्रे माझ्या विधीज्ञांकडे दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मृत्यूपत्राआधारे मी दावा मिळकतीचा मालक झालेलो आहे असा माझा दावा आहे.

**(प्रतिवादीच्या वकीलांनी कागदपत्रे हजर करण्याच्या कारणास्तव विनंती केली. विनंती मान्य करण्यात आली. उलटतपास पुढील तारेखपर्यत तहकुब करण्यात आला ).**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

**सही/-**
**(श्रुती ह.पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**देवरुख**

**दि. १०/०७/२०२४**